संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ जानेफळ येथे प्रचंड रॅली >> पान 2

आमदार संजय रायमुलकर यांच्या सभेला चिक्कार गर्दी >> पान 3

महाविकास आघाडीला मतदारांचा कौल ! >> पान 4

सुविचार
प्रत्येक दिवस नवीन आव्हानांसाठी सज्ज असतो.

दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

बीआर चोप्रांच्या 'महाभारत'मध्ये जुही करणार होती मोठी भूमिका, मग काय झाले?

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 99 ■ सोमवार, दि. 18 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

मतदारांनी कोणत्याही आमिष, दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीचे मतदान येत्या २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतदारांनी कोणत्याही प्रकारच्या आमिष, दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील मलकापूर, बुलढाणा, मेहकर, सिंदखेड राजा, खामगांव, चिखली आणि जळगांव जामोद या सातही विधानसभा मतदारसंघात एकाच दिवशी दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू आहे.या निवडणुकीच्या काळात मतदारांना विविध प्रकाराचे आमिष, दबाव टाकण्याचे प्रकार उघडकीस येतात. निवडणूक काळात मतदारांना कोणत्याही प्रकारचे आमिष, दबाव टाकले जात असल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे आणि कोणत्याही आमिष, दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे.

भारत निवडणूक आयोगाने

मतदान केंद्रात मोबाईलवर बंदी

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोबाईलवर बंदी राहणार आहे. मतदान केंद्रात मतदारांनी मोबाईल व इतर ईलेक्ट्रॉनिक वस्तू आणू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदान केंद्रात विविध सुविधा

मतदान केंद्रावर मतदारांसाठी प्रतिक्षालय, बेंच, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर आदी सुविधा पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मतदारांच्या मदतीसाठी वोटर हेल्पलाईन ॲप

निवडणूक आयोगाने वोटर हेल्पलाईन ॲप उपलब्ध केले आहे. या ॲपद्वारे मतदारांना मतदार यादीत आपले नाव व मतदान केंद्राची माहिती करुन घेता येणार आहे.

मतदानासाठी १२ ओळखपत्र ग्राह्य

मतदान कार्ड अभावी मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोगाने १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले आहेत. त्यानुसार आधार कार्ड,पॅन कार्ड,मनरेगाचे रोजगार ओळखपत्र,बँक किंवा टपाल विभागाचे पासबुक,आरोग्य विमा स्मार्ट कार्ड,ड्रायव्हिंग लायसन्स,पासपोर्ट, भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड,पारपत्र (पासपोर्ट),निवृत्तीवेतनाचे दस्तावेज,केंद्र अथवा राज्य शासन,तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम,पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र,संसद,विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र,भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे१२पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. मतदारांनी यापैकी कोणतेही ओळखपत्र सोबत आणून मतदान करावे.

मतदारांच्या तक्रारींसाठी सीव्हिजील प उपलब्ध केले असून त्यावरही तक्रार करता येणार आहे. तसेच जिल्ह्यात आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवरील कारवाईसाठी भरारी पथक, स्थिर सर्वेक्षण पथके, पोलीस प्रशासन, आयकर विभाग आणि जीएसटी विभागाचे पथक कार्यरत करण्यात आले आहेत. मतदारांनी आचारसंहितेच्या उल्लंघनाविषयीच्या घटना या पथकांच्या निदर्शनास आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा दिवस आहे. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क निर्भीडपणे बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मतदानासाठी चार व्यक्तींना प्रवेश

मतदान केंद्रावरील गर्दी, रांग कमी करण्यासाठी एकावेळी चार जणांना मतदानासाठी प्रवेश दिला जाणार आहे.

खोट्या नरेटिव्हमुळे डॉ सुभाष भामरे यांचा पराभव- एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

धुळे/प्रतिनिधी : साखरी विधानसभा निवडणूक मतदार संघातील शिवसेना महायुतीच्या उमेदवार मंजुळा गावित यांच्या प्रचारार्थ आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साखळी दौऱ्यावर आले होते यावेळी त्यांनी मोठ्या मताधिक्याने मंजुळा गावित यांना विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान त्यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले की लोकसभेच्या वेळी विरोधकांनी संविधान बदलणार असा खोटा निरीटिव्ह पसरवला होता, आणि या खोट्या निरीटिव्ह मुळेच पाच मतदार संघात आघाडीवर असलेले माजी केंद्रीय राज्यमंत्री सुभाष भामरे यांचा एका मतदार संघामुळे पराभव झाला. त्यामुळे याचा बदला आता आपल्याला ह्या विधानसभा निवडणुकीमध्ये घ्यायचा आहे. असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सुरेश वाडकर, अजिंक्य देव, अमृता खानविलकर, वैभव तत्ववादी; आशिष शेलारांच्या प्रचारासाठी कलाकारांची मोठी फौज मैदानात!

मुंबई/प्रतिनिधी : अवघ्या काही तासांमध्ये थंडावणाऱ्या प्रचाराचा तोफा सध्याच्या घडीला मात्र प्रत्येक मतदारसंघात जोमाने धडकतायत. जोरदार भाषणं, होणारे वार-प्रतिवार या सगळ्यामध्ये म तदारांना आपल्या बाजूने वळवणं हाच प्रत्येकाचा सर्वो तोपरी मानस आहे. अगदी विधानसभा निवडणुकांची घोषणा होण्याआधीपासून राजकीय पक्षांनी कंबर कसली होती.त्यांच्यासाठी सेलिब्रेटीही प्रचाराच्या रिंगणात उतरले. भाजपचे वांद्रे पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार आशिष शेलार यांच्यासाठी कलाकारांची मोठी फौज मैदानात उतरली आहे.

ज्येष्ठ गायक पं. सुरेश वाडकर, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, अभिनेते अजिंक्य देव, शरद पोंक्षे, नंदेश उमप, पुष्कर श्रोत्री, वैभव तत्ववादी, आदिनाथ कोठारे, अभिजित खांडेकेकर, अभिनय बेर्डे, अभिनेत्री अमृता खानविलकर, श्रुती मराठे, मृण्मयी देशपांडे, विशाखा सुभेदार, दिग्दर्शक विजू माने, विनोदवीर अरुण कदम, प्रभाकर मोरे, भारत गणेशपुरे, सागर कारंडे, गौरव मोरे यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार या प्रचाराच्या दौऱ्यात सहभागी होणार असल्याची माहिती सध्या समोर येत आहे.

सोमवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता वाजता सांताक्रूझ पश्चिम येथील हायलाईफ मॉलपासून प्रचार फेरीला सुरुवात होईल. पुढे खोतवाडी, संभाजी मैदान, गरोडिया नगर, मिलन सबवे रोड, साने गुरुजी रोड, दौलत नगर, शास्त्रीनगर, ओल्ड पोलीस क्वार्टर, जुहू रोड, एस.बी पाटील मार्ग, गजधन बांध, सिद्धिविनायक मंदिर, मरु आई मंदिर, शंकर व्यायाम शाळा, दांडपाडा नाका, सी डी मार्ग, दांडा नाका येथे पोचून श्रीराम मंदिर रोडजवळ ही रॅली संपेल. विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात सेलिब्रेटींच्या उपस्थितीची जोरदार चर्चा झाली. भाऊ कदम, सयाजी शिंदे, कुशल बद्रिके, वर्षा उसगांवकर यांसह बरेच कलाकार या प्रचाराच्या रिंगणात आहेत. रितेश देशमुख,किरण माने, शरद पोंक्षे, संजय नार्वे कर या कलाकारांनी संबंधित पक्षाच्या व्यासपीठावरुन अगदी खणखणीत भाषणं देखील केली आहेत. त्याम ुळे राजकीय पक्षांच्या प्रचारामध्ये सेलिब्रेटींनीही जोर लावल्याचं पाहायला मिळालं आहे.

शिवसेनेचा धनुष्य, बाळासाहेबांचे विचार आम्ही सोडवून आणले

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघात :

आपला विदर्भ च्या मुलाखतीत अनेक प्रश्नावर झाले बोलके

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा : विधानसभा निवडणुकीत शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत नसून बाळासाहेबांची शिवसेना विरुद्ध उबाठा अशी लढत होत आहे. उद्धव ठाकरे यांनी दिल्ली दरबारी बाळासाहेबांचे विचार, शिवसेनेचा धनुष्य, हिंदुत्व गहाण ठेवले होते. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उठाव करून सोडवून आणले आणि हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराची शिवसेना उभी केली. असे मत केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त करत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यावर प्रखर टीका केली. ते आपला विदर्भ न्यूज चॅनलला मुलाखत देताना बोलत होते. यावेळी त्यांनी दिलखुलास मत व्यक्त करून अनेक प्रश्नांवर भाष्य केले. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची संपूर्ण महाराष्ट्राचे लाडके पुढारी असलेले घनश्याम दरोडे यांनी आपला विदर्भ न्यूज चॅनलच्या वतीने मुलाखत घेत त्यांना अनेक प्रश्नांवर बोलते केले. यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी सुद्धा दिलखुलास मत व्यक्त करीत उद्धव ठाकरे यांच्यावर घणघात केला. यावेळी आपला विदर्भाला मुलाखात देताना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे, संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीच्या बाजुने मतदारांचा कौल आहे. त्याचबरोबर होम पीच असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात महायुतीकडून ७ जागांवर उमेदवार निवडणूक लढवीत असून ७ ही जागांवर आमचा विजय होईल, २३ नोव्हेंबरला हा निकाल दिसून येईल. गत वेळेस ६ पैकी ५ जागा आम्ही जिंकल्या होत्या, आता महायुती सरकारच्या काळात

अनेक निर्णय हे जनहिताचे घेतले गेले आहेत. मतदारांकडून या निर्णयाचे स्वागत होत आहे, त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीला मतदारांचा कौल राहील, यात काही शंका नाही आणि हे २३ नोव्हेंबरला दिसून येणार आहे. तर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होत असल्याचे आम्ही मानत नाही, तर बाळासाहेबांचे शिवसेना विरुद्ध उबाठा अशी लढत आहे. लोकसभा निवडणुकीत सुद्धा मतदारांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे आणि आताही विधानसभा निवडणुकीमध्ये पाठिंबा देतील, लाडकी बहीण, भाऊ आमच्यासोबत आहेत. अडीच वर्षाच्या महायुतीच्या काळात अनेक निर्णय हे समाजित डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे जनता खूप आनंदी आहे. महायुतीच्या नेत्यांवर, कारभारावर,जनता खुश आहे आणि हे २० नोव्हेंबरला भरभरून मत देऊन २३ नोव्हेंबरला दिसून येणार आहे, तर लाडके दाजी वाढती महागाई शेतमालाला भाव नसल्याने नाराज असल्याचा प्रश्न केला असता, प्रतापराव जाधव यांनी भाव कमी झाले असले तरी पिक विमा व इतर अनेक पद्धतीने शेतकर्यांना मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आली असल्याचे सांगितले, तसेच लाडक्या बहीण योजनेचे पैसे सुद्धा जमा झाले आहेत. शेतकरी सन्मान निधीची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली असून त्याचा मोठा फायदा शेतकर्यांना झाला आहे. आता लाडकी बहिण योजनेची रक्कम १५०० रुपयावरुन २१०० रुपये करण्यात येणार आहे. शेतकरी सन्मान निधी हा १२ हजार रुपयांवरून १५ हजार रुपये करण्यात येणार आहे. अशा अनेक योजनांमुळे लोकांच्या मनात कोणतीही नाराजी नाही, तर महाविकास आघाडीने या योजनामुळे देशावर कर्ज होत असल्याचा आरोप केला होता. त्यामुळे आता या योजनांमुळे ताळमेळ बिघडत आहे का असा प्रश्न उपस्थित केला असता महाविकास आघाडीने याच लाडकी बहीण योजनेवर टीका केली असल्याचे सांगून निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती,आता उलट बेशरमासारखे ३ हजार रुपये देऊ असे म्हणून जनतेला फसवण्याचे काम करीत आहे. महाविकास आघाडीने ३ हजार काय ३० हजार देण्याचे आश्वासन दिले तरी त्यांच्यावर जनतेचा विश्वास नाही, तर पवार साहेबांची सभा सुरू असताना पाऊस पडला याचा फायदा होईल का असा प्रश्न केला असता आता कुठलाही फायदा होणार नाही महायुतीचे विकास कामे जनतेला भावलेली आहेत, त्यामुळे जनतेचा महायुतीला कौल आहे असल्याचे सांगितले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मी गेल्यानंतर उद्धवला सांभाळा असे आवाहन केल्यानंतरही तुम्ही उद्धव ठाकरे यांना सोडून गेले, असा प्रश्न केला असता प्रतापराव जाधव यांनी बाळासाहेब यांनी उद्धव ठाकरे यांना सांभाळा या आवाहानाचे समर्थन करीत होकार दिला, मात्र बाळासाहेबांनी सांगितले होते की, माझे विचार सोडू नका, काँग्रेससोबत शिवसेना कधीही जाऊ देऊ नका, असे सुद्धा सांगितले होते. मात्र बाळासाहेब गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्वाचे विचार, धनुष्यबाण हा दिल्ली येथे गहाण ठेवला, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचा धनुष्यबाण त्यांचे हिंदुत्व विचार हे सोडून आणण्याचे काम केले असल्याचे सांगितले. तर येणाऱ्या निकालाबाबत संभ्रम आहे का असा प्रश्न केला असता प्रतापराव जाधव यांनी उबाठाच्या वतीने लोकसभा निवडणुकीत २२ जागा लढवल्या होत्या, त्यापैकी ते ९ जागांवर विजयी झाले. तर शिवसेनेच्या वतीने आम्ही १५ जागा लढवल्या आणि सात जागांवर विजयी झालो, आमचा स्ट्राईकरेट सुद्धा चांगला आहे,उबाठा शिवसेना ही परावलंबी आहे, त्यांच्याजवळील हक्काचे मत बाजुला केल्यास त्यांच्याकडे हिंदुत्व मतदार नसल्याचे सांगितले. तर शेतमालाचे भाव कमी झाले असला तरी भावांतर योजना जाहीर केली असून २० टक्के भावांतर योजना लाभ देण्यात येणार आहे. सोयाबीनला ६ हजार रुपये भाव, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, आदी योजना वचननाम्यात जाहीर केल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे. तर अजित पवार यांनी शरद पवार यांना या काळात सोडल्याने शरद पवार यांना सहानुभूती मिळत आहे तर अजित पवार यांचा महायुतीला कितपत फायदा होईल का, अजित पवार यांच्यावर तुम्ही ७० हजार कोटी रुपयांच भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता,त्यांना जैलात टाकण्याऐवजी मंत्रिमंडळात टाकले असा प्रश्न उपस्थित केला असता, आरोप केले जातात अजित पवार हे विकास पुरुष असल्याचे मत व्यक्त केले. तर अजित पवार यांचे महायुतीला फायदा होईल का असा प्रश्न केला असता माहितीमध्ये अनेक घटक पक्ष आहेत त्याचा महायुतीला बहुमत मिळवण्यासाठी फायदा होणार असून बहुमत मिळवल्यानंतर एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे निर्णय घेतील असे मत त्यांनी व्यक्त केले.

देविदास खनपटे
मुख्य संपादक

समाजमाध्यमे आणि निवडणूका

येत्या २० नोव्हेंबरला राज्यात सार्वत्रिक विधानसभा निवडणुका होत आहेत. त्यासाठी सर्व सरकारी यंत्रणा कामाला लागली आहे. उमेदवारी अर्ज भरलेल्या अनेक हवसे-नवसे-गवस्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आता निवडणूक रिंगणातील चित्र स्पष्ट झाले आहे. उमेदवारांनी आपापला प्रचार सुरू केला आहे. हा मोबाईलचा जमाना आहे. त्यामुळे तुम्हाला पूर्वीसारखा इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. तथापि, ही माध्यमे तशी एकतर्फी (दहा ुर) माहिती प्रसाराची आहेत. आता मात्र समाज माध्यमांची अर्थात सोशल मीडियाची यात भर पडली आहे. याआधीच्या, म्हणजे २०१४ आणि २०१९ मधील निवडणुकांपासून तर समाज माध्यम हे एक अत्यंत प्रभावशाली माध्यम ठरले आहे. हे माध्यम अन्य माध्यमासारखे एकतर्फी नाही, तर दुतर्फी तसेच परस्परसंवादी (इंटर ॲक्टिव्ह) स्वरूपाचे आहे. माहिती व तंत्रज्ञाना झालेल्या क्रांतीनंतर चालू २१ व्या शतकाच्या प्रारंभी समाज माध्यमे उदयास आली. आता फेसबुक, यू-ट्यूब, ट्विटर, इंस्टाग्राम आदी माध्यमांबरोबरच, व्हॉट्सॲप, फेसबुक मेसेंजर, टेलीग्राम आदी जलद संदेश प्रसार (मेसेजिंग ॲपचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. या जलद संदेश वहनाचे वैशिष्ट्या म्हणजे इमेसेजेस, ऑडियो, व्हिडिओ तसेच लिखित मजकूर अशा सर्वच स्वरूपात संदेश तात्काळ मोठ्या लोकसंख्येपर्यंत पोहोचवता येतो, तसेच त्यासाठी लागणारा खर्चही अत्यल्प असतो. समाज माध्यमांमध्ये प्रत्येक नागरिक पत्रकाराच्या भूमिकेत येऊ शकतो. सिटीझन रिपोर्टर ही संकल्पना आता रुळली आहेच. सध्या निवडणुकांचा कालावधी असल्याने एकाच वेळी असंख्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार आणि राजक पक्ष समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करत असल्याचे दिसून येते. समाज माध्यमांचा वापर ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ माहितीच्या प्रसारासाठी केला जातो. त्याप्रमाणे चुकीची, खोटी माहिती पसरविण्यासाठीही केला जात असल्याचे दिसून आले आहे. राजकीय जाहिरातीच्या पूर्वप्रमाणीकरणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २००४ रोजी (माहिती व प्रसारण विभाग विरुद्ध मे. जेमिनी टी. व्ही. प्रा. लि. आणि इतर यांच्या याचिकेवर) दिलेल्या आदेशानुसार भारत निवडणूक आयोगाने १५ एप्रिल २००४ रोजी सविस्तर दिशानिर्देश जारी केले आहेत. त्यानुसार प्रत्येक नोंदणीकृत राष्ट्रीय, राज्यस्तरीय पक्ष किंवा निवडणुकीस उभ्या राहणाऱ्या उमेदवाराने दूरचित्रवाणी अथवा केबल वरून जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी त्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करून घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने विविध स्तरावर समित्यांची स्थापना करण्याचेही निर्देश दिले होते. राज्य व जिल्हा स्तरावर ज्या माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती (२१) गठीत आहेत, त्यांची स्थापना या निर्देशानुसार करण्यात आली आहे. राज्य आणि जिल्हा स्तरावरील समित्यांमध्ये समा माध्यम तज्ञांचा समावेश करण्यात आला असून राज्य स्तरावर समाज माध्यमे नोडल अधिकाऱ्याचीदेखील नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीमध्ये अपप्रचार करणे, मतांच्या ध्रुवीकरणास कारणीभूत होईल अशा प्रकारचा दिशाभूल करणारा चुकीचा मजकूर टाकणे, लोकांच्या मनात निवडणूक प्रक्रियेविषयी शंका निर्माण होईल अशा नकारात्मक बाबीसाठीही समाज माध्यमांचा वापर होऊ शकतो. हे ओळखून भारत निवडणूक आयोगाने २०१४ च्या निवडणुकांपासूनच समाज माध्यमांवर लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. समाज माध्यमांचा गैरवापर टाळण्यासाठी आणि सकारात्मक वापर व्हावा या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाच्या सल्याने 'इंटरनेट अँड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया' ने २०१९ मधील मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान स्वयंप्रेरीत आचारसंहिता निर्माण केली आहे. निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय आणि पारदर्शक स्वरूपात पार पाडण्यासाठी आयोग कटिबद्ध असण्याची गरज आहे. भारत निवडणूक आयोग तसेच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून समाज माध्यमांचा अधिकाधिक वापर करून मतदान प्रक्रियेचे महत्त्व आणि हक्क व कर्तव्याची जाणीव मतदारांमध्ये निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ जानेफळ येथे प्रचंड रॅली

मोठा जनसमुदाय पाहून सभेत गहिवरून गेले रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ

मेहकर/ प्रतिनिधी : महायुतीचे उमेदवार संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ जानेफळ येथे काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीत मोठा जनसमुदाय उपस्थित होता. ढोल ताशांच्या निनादात निघालेली भव्य रॅली विरोधकांच्या काळजात धडकी भरवणारी होती .परिसरातील काही गावातील नागरिक रॅलीत सहभागी झाले होते. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत रायमुलकरांवर प्रेम करणारा मोठा जनसमुदाय पाहून त्यांना भाषण करताना अक्षरशः गहिवरून आले.

जानेफळ येथील मोठ्या संख्येने सहभागी झालेले नागरिक यामुळे या रॅलीला अक्षरशः जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले. संजय रायमुलकर यांच्या धनुष्यबाण निशाणीचे बटन दाबून त्यांना

मोठ्या संख्येने विजयी करण्याचे गावातील नागरिकांना आवाहन करण्यात आले. महायुतीतील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जवळपास अर्धा किलोमीटर लांबीची ही रॅली अभतपूर्व होती.

त्यानंतर झालेल्या सभेत भाषण करताना संजय रायमुलकर यांचा लोकांचे असीम प्रेम पाहून अक्षरशः कंठ दाटून आला. महाराष्ट्रातील सर्व आमदारांमध्ये मी भाग्यवान आमदार असून मतदारसंघातील जनतेचे मोठे प्रेम मला लाभलेले आहे ,असे ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारख्या धाडसी नेतृत्वाखाली काम करणाऱ्या महायुती सरकारने सर्व समाज घटकांसाठी मोठ्या प्रमाणावर त्यांचे हित साधणाऱ्या योजना आणल्या. मतदारसंघात चार हजार कोटींची विकास कामे केली हा एक विक्रम आहे. इथल्या माणसांचे सदैव मिळालेले प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्यासाठी सतत झटत राहणे, मोठ्या प्रमाणावर विकास कामाच्या माध्यमातून मतदार संघाला प्रगतीवर नेणे हेच माझे ध्येय आहे. केंद्रीय मंत्री मार्गदर्शक प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक हिताची कामे मोठ्या प्रमाणात शिवसेनेच्या माध्यमातून करता आली हे माझे भाग्य आहे असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. केशव अवचार,भाजपचे डॉ.सतीश कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस गिरधर पाटील ,विश्वासराव सवडतकर, भाई कैलास सुकदाने, गणेश बोचरे, श्रीमती राजूरकर यांची आमदार संजय रायमुलकर यांच्या कारकिर्दीबद्दल महती सांगणारी भाषणे झाली.

यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, उपतालुकाप्रमुख संदीपजी, विश्वासराव सवडतकर, हिम्मतराव आवले, अशोक बोरकर,सचिन राजूरकर, मोहन धोटे, गजानन दुतोंडे, मदन पाटील ,कैलासराव चौरे, माधवराव आरसोडे, सहदेव आल्हाट ,सुपाजी पायघन, विलास मोहरूत, अशोक पसरटे,सुभाष खुरद,बंडु जाधव, आकाश सवडतकर ,आकाश मुरडकर,मधुकर रहाटे,राहुल देशमुख,राजीव देशमुख ,रमेश निकस ,ऍड. नरवाडे, पंडितराव धोटे,अमर राऊत, गजानन तोंडे, विशाल फितवे, उमेश सदावर्ते ,नंदकिशोर निकस, निर्मलाताई निकस,ललिताताई आवळे, सुरेश आडे,संदीप आल्हाट, मोतीचंद राठोड ,समाधान साबळे,मनोहर खंडारे, सागर महाराज भोंडे, किरण महाराज शिंदे, सिताराम महाराज ठोकळ ,महादेव दहिभाते ,संजय उतपुरे, सुरेश काठोळे, राजू वाळके ,रामेश्वर मुरडकर आदी अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

निवडणूक कर्मचाऱ्यासाठी १३३ बसेसची व्यवस्था

दैनिक आपला विदर्भ

नांदेड/प्रतिनिधी : नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना १८ व १९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदारसंघात नेऊन सोडणे व २० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर परत संबंधीत कर्मचारी यांना त्यांच्या मुळ विधानसभा मतदार संघात आणण्यासाठी ४४ सीटरच्या एकूण १३३ बसेस वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या नियुक्त्या व वेळा बघून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक विभागाने केले आहे.

लांब पल्ल्यासाठी उद्या दिनांक १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ४ तर जवळच्या केंद्रासाठी १९ तारखेला सकाळी ५ ते ७ या काळात कर्मचाऱ्यांसाठी बसेस उपलब्ध राहणार आहेत. आपल्या नियुक्त क्षेत्राकडे जाण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

कुठून निघतील बसेस

८३ -किनवट मतदारसंघातील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी शासकीय आयटीआय गोकुंदा, किनवट येथून बसेस निघणार आहेत. ८४ हदगाव मतदारसंघासाठी समाज कल्याण विभागाचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बुध्दभूमी वसाहत, तामसा रोड, हदगाव येथून बस निघतील. ८५ भोकर साठी नगरपरिषद नांदेड रोड, भोकर येथून तर ८६ -नांदेड उत्तर व ८७- दक्षिण साठी शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथून बसेस निघणार आहेत. ८८ लोहासाठी पंचायत समिती, तहसिल कार्यालय परिसर लोहा येथून तर नायगावसाठी शासकीय आयटीआय, नायगाव येथून बसेस निघणार आहेत. ९०- देगलूर साठी तहसिल कार्यालय, देगलूर येथून तर ९१-मुखेडसाठी मुख्य प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय, मुखेड येथून बसेस निघतील.

अशी आहे निवास व्यवस्था

किनवट मतदारसंघासाठी मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश स्कूल, कोठारी (चि) किनवट येथे निवास व्यवस्था करण्यात आली आहे. तर हदगाव मतदारसंघासाठी मुलींचे वस्तीगृह इमारत क्र. २ तीसरा मजला, हदगाव येथे तर ८५ भोकर साठी ओम लॉन्स मंगल कार्यालय, बायपास रोड, भोकर येथे निवास व्यवस्था केली आहे. ८६ -नांदेड उत्तर व ८७- दक्षिणसाठी निवास व्यवस्था ए.के.संभाजी मंगल कार्यालय, नांदेड येथे केली आहे. ८८ लोहा साठी निवास व्यवस्था श्रीनिवास मंगल कार्यालय साई गोल्डन, सिटी मेन रोड, लोहा येथे केली आहे. ८९- नायगावसाठी सामाजिक न्याय भवन, निवासी वसतीगृह नायगाव येथे निवास व्यवस्था येथे केली आहे.

९०- देगलूर मतदार संघासाठी निवास व्यवस्था नगरेश्वर मंदीर व मंगल कार्यालय, देगलूर येथे केली आहे. ९१-मुखेड मतदार संघासाठी कै. गोविंदराव राठोड बहुउद्देशिय सभागृह तालुका क्रीडा संकुल, बीएसएनएल टॉवरजवळ शांतीनगर, मुखेड येथे निवास व्यवस्था केली आहे.

तरी मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांनी लांब पल्ल्यासाठीच्या मतदारसंघात जाण्यासाठी १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ४ यावेळेत आणि जवळच्या अंतरासाठी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ५ ते ६ वाजता बसेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तरी मतदानासाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वाहतुक व्यवस्थापन कक्ष प्रमुख तथा पुनर्वसन अधिकारी यांनी केले आहे.

विकासाच्या मुद्द्यावर सुजात आंबेडकर यांची तोफ धडाडली

डोणगावातील सभेला प्रचंड गर्दी

भकास अवस्था बदलण्यासाठी डॉ. ऋतुजा चव्हाण यांना निवडून देण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

डोणगाव/ प्रतिनिधी : मतदार संघात असंख्य समस्या आहेत. शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापसाला भाव नाही. शेतकऱ्यांची अवस्था ही अत्यंत बिकट झाली असताना पंतप्रधान शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू असे सांगत आहेत, पण सोयाबीनचे भाव तर निम्म्यावर आलेत. शेतमालाला भाव आणि या मतदारसंघात विकास हवा असेल, तर अभ्यासू, सुशिक्षीत नेतृत्व डॉ. ऋतुजा चव्हाण यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू सुजात आंबेडकर यांनी केले. ते डोणगाव येथील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारार्थ दि.१६ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलत होते. मेहकर लोणार मतदार संघातील उच्च विद्याविभूषित व्यक्तिमत्व तथा वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ.ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारार्थ सुजात आंबेडकर यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला नागरिकांची प्रचंड गर्दी केली होती. यावेळी सुजात आंबेडकर यांनी डोणगाव येथील वादळी सभेत सत्ताधाऱ्यांचा समाचार घेत 'सोयाबीन, कपाशीचे गडगडलेले भाव पडलेले आहेत. तर महागाईने कळस गाठला आहे. मेहकर लोणार मतदार संघाची व डोणगाव शहराची अवस्था भकास झालेली आहे. मतदार संघातील हे चित्र पालटायचे असेल व गोरगरीब सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी परंपरागत पक्षांना मात द्यावी व अभ्यासू, उच्चशिक्षित, तळमळीचे उमेदवार विधानसभेत पाठवावे, मतदार संघाचा विकास करण्यासाठी डॉ.सौ.ऋतुजा चव्हाण हा सक्षम पर्याय आहे. परिवर्तनासाठी, विकासासाठी ऋतुजा चव्हाण यांना निवडणूक द्या, असे आवाहनही सुजात आंबेडकर यांनी केले. या सभेला वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते यांच्यासह युवकांची व मतदार संघातील नागरिकांची हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. ऋतुजा चव्हाण यांना जनतेकडून प्रचंड प्रतिसाद

मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडी व शेतकरी चळवळीच्या उमेदवार डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारार्थ सुजात आंबेडकर हे डोणगाव येथे आले होते.यावेळी त्यांच्या सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. डॉ. ऋतुजाताई चव्हाण यांना व्यापक जनसमर्थन लाभले असून, यंदा या मतदारसंघात परिवर्तन अटळ असल्याचे मानले जात आहे. गाव, शहर ते संपूर्ण मतदारसंघ पालथा घालत ऋतुजा ताई चव्हाण यांना जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. ठिकठिकाणी त्यांचे स्वागतही होत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

३५६१ मतदारांनी बजावला गृहमतदानाचा हक्क ८५ वर्षावरील २९०४ तर ६४२ दिव्यांग मतदारांनी केले मतदान

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा/ प्रतिनिधी : निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच ८५ वर्षावरील आणि दिव्यांग मतदारांना गृहमतदानाचा हक्क उपलब्ध करून दिला आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघात १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान ३७९९ पैकी ३५६१ मतदारांनी गृहमतदान करत मतदानाचा हक्क बजावला. यात मलकापूर, बुलढाणा, चिखली, सिंदखेडराजा, मेहकर, खामगाव आणि जळगाव जामोद या सातही मतदारसंघातील मतदारांनी गृहमतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ८५ वर्षावरील एकूण ३१०७ पैकी २९०४ व ६७४ पैकी ६४२ दिव्यांग मतदारांनी आणि १८ पैकी दोन अत्यावश्यक सेवेतील मतदारांनी गृहमतदान केले.

निवडणूक आयोगाच्यावतीने विधानसभेसाठी पहिल्यांदाच गृह मतदान हा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमात जिल्ह्यातील ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांनी सक्रिय सहभाग घेतला होता

गृहमतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असून मलकापूर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ३२० आणि ७८ दिव्यांग, बुलढाणा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २७५ आणि ५८ दिव्यांग, चिखली मतदारसंघात ८५ वर्षांवरील ४३३ आणि १४४ दिव्यांग, सिंदखेडराजा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ७०३ आणि ३४ दिव्यांग, मेहकर मतदारसंघात ८५ वर्षांवरील ५८३ आणि १४९ दिव्यांग, खामगाव मतदारसंघात ८५ वर्षांवरील २०० आणि ७४ दिव्यांग, जळगाव जामोद मतदारसंघात ८५ वर्षांवरील ३९० ज्येष्ठ नागरिक आणि १०५ दिव्यांग मतदारांनी गृहमतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावला.

सत्ता, पैशाचा गैरवापर करत मोदींकडून महाराष्ट्रात सरकार – प्रियांका गांधी

कोल्हापूर/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकशाहीचे संकेत पायदळी तुडवले आहेत. नीतिमत्तेच्या गोष्टी करणाऱ्या मोदींनी सत्ता आणि पैशाचा गैरवापर करून महाराष्ट्रातील सरकार चोरून बनवले, अशी टीका काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी शुक्रवारी येथे केली. अशा प्रवृत्तीला धडा शिकवण्यासाठी निवडणुकीत महाविकास आघाडीच्या पाठीशी ठामपणे उभे राहा, असे आवाहन त्यांनी येथे आयोजित सभेत केले.

सभेला खासदार शाहू महाराज, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सतेज पाटील, काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी गांधी यांनी ऋतुराज पाटील, राजेश लाटकर, गणपतराव पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधान मोदी हे देशाची प्रगती झाली असे प्रत्येक भाषणात सांगत असतात. आजही महिलांना महागाईचा साम ना करावा लागतो. शेतकऱ्यांना हमीभावासाठी झगडावे लागते. बेरोजगारांना नोकऱ्यांसाठी पायपीट करावी लागते. विकासाचे कोणतेही प्रश्न सोडवले गेले नाहीत. त्यांनी देशातील उद्योगपतींची १६ लाख कोटींची कर्जे माफ केली, परंतु शेतकऱ्यांना देण्यासाठी या सरकारकडे पैसे नाहीत, अशी टीका गांधी यांनी केली.भ्रष्टाचारावर बोलण्याचे तुमचे धाडस कसे होते, असा प्रश्न उपस्थित करून गांधी म्हणाल्या, की महाराष्ट्रातील लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेले शासन तुम्ही खरेदी केले. अशा मोदी यांना संविधानावर बोलण्याचा कोणता अधिकार आहे, अशा शब्दांत त्यांनी हल्लाबोल केला. पंतप्रधान तर सोडा त्यांचे मंत्रीही सामान्य लोकांना भेटत नाहीत. किंबहुना सामान्य जनतेचे दैनंदिन जीवनाचे कोणते प्रश्न आहेत हेच त्यांना माहीत नाही. केवळ सत्ता मिळवणे हेच मोदी यांचे धोरण आहे. एकीकडे सभा मंचावर गेले की ते बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतात आणि कोकणात शिवाजी महाराजांचा पुतळा पडला जातो. त्यांना शिवाजी महाराजांच्या धोरणाशी काहीच देणे-घेणे नाही.

बीआर चोप्रांच्या 'महाभारत'मध्ये जुही करणार होती मोठी भूमिका, मग काय झाले?

मुंबई/प्रतिनिधी : अभिनेत्री जुही चावलाचा आज ५७ वा वाढदिवस आहे. जुही ही हिंदी चित्रपटसृष्टीतील एक उत्तम अभिनेत्री आहे. बबली स्माईलसाठी ओळखली जाणारी अभिनेत्री जुही चावला हिचा जन्म १९६७ मध्ये हरियाणातील अंबाला येथे झाला. जुहीने अनेक लोकप्रिय कलाकारांसोबत स्क्रीन शेअर केली आहे. डर, कयामत से कयामत तक, स्वर्ग, बोल राधा बोल, इश्क आणि फिर भी दिल है हिंदुस्तानी यांसारख्या अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये तिने चमकदार अभिनय केला, जो आजही लोकांच्या स्मरणात आहे.

जुहीने १९८४ मध्ये मिस इंडियाचा खिताब जिंकला आणि १९८६ मध्ये तिला 'सल्तनत' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पहिला ब्रेक मिळाला. पण तुम्हाला माहित आहे का की जूही बीआर चोप्रा यांच्या प्रसिद्ध टीव्ही शो महाभारतचा भागही बनणार होती, पण नंतर असे काही घडले ज्यामुळे ती या शोपासून वेगळी झाली.३७ वर्षांपूर्वी दूरदर्शनवर एक मालिका आली होती, जिने प्रत्येकाचा टीव्ही पाहण्याचा अनुभव बदलून टाकला होता. या मालिकेने सर्वांना मंत्रमुग्ध केले आणि प्रत्येक कुटुंबाला रविवारी सकाळी तासभर आपली सर्व कामे सोडून ही मालिका पाहण्याची संधी दिली.

आमदार संजय रायमुलकर यांच्या सभेला चिक्कार गर्दी

■ प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे केंद्रीय मंत्री जाधव यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

मेहकर/ प्रतिनिधी : मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ डोणगांव येथे दि. १७ नोव्हेंबर रोजी भव्य रॅली व जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला मतदारांनी प्रचंड संख्येने हजेरी लावली होती. तर या सभेला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी उपस्थित राहून संबोधित करून आ.संजय रायमुलकर यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सभेला संबोधीत करताना म्हणाले की, मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघ हा नेहमीच विकासाच्या मागे राहला आहे. आ.संजय रायमुलकर यांच्या कार्यकाळात अनेक भरीव विकासकामे या मतदारसंघात झाली आहे. हाच विकासाचा झंझावात पुढील पाच वर्षात असाच चालू ठेवण्यासाठी मेहकर विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने महायुती सरकारच्या पाठिमागे खंबीर उभे राहून दि.२० नोव्हेंबर ला महायुतीचा अधिकृत उमेदवार आ.संजय रायमुलकर यांना धनुष्यबाणसमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे, असे अवाहन केले. यावेळी महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच या सभेला मतदार संघातील नागरिकांसह महिलांची प्रचंड संख्येने उपस्थिती होती.

'...तर हुतात्मा स्मारकावर अदानींचा टॉवर असेल, विकास झाला म्हणत...'; मोदी-शाहांचं नाव घेत राऊतांचा टोला

मुंबई/प्रतिनिधी : उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबरच केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या निवडणूक प्रचाराच्या दौऱ्यांवर निशाणा साधतानाच 'गौतम अदानी हा या निवडणुकीतील ज्वलंत विषय आहे,' असं म्हटलं आहे. ''म हाराष्ट्राचे मराठीपण टिकवायचे असेल तर हे राज्य मोदी-शहा-फडणवीसांच्या हाती जाता कामा नये,'' असं म्हणतानाच राऊतांनी, ''महाराष्ट्राची लढाई ही आता सरळ सरळ गौतम अदानी व त्यांच्या पैशांच्या साम ाज्याविरुद्ध आहे,'' असं विधान केलं आहे.

महाराष्ट्र म्हणजे मोदी-शहांची दौलत नाही

''मोदी-शहा-फडणवीस व गौतम अदानी हा या निवडणुकीतला ज्वलंत विषय आहे. महाराष्ट्राचे मराठीपण टिकवायचे असेल तर हे राज्य मोदी-शहा-फडणवीसांच्या हाती जाता कामा नये. मुंबईतील सर्व मोक्याच्या जमिनींचा ताबा अदानी यांना देण्यात आला. मिठागरे, जकात नाके अशा जागांवर अदानी यांनी आताच खुंट्या ठोकल्या. नवी मुंबईत सातारा-पाटण रहिवाशांच्या मेळाव्यात गेलो. तेथील रहिवाशांनी माहिती दिली, ''अदानी आता साताऱ्यातही घुसले.'' महाराष्ट्रातील सरकार अदानी यांच्यावर विशेष मेहेरबानी दाखवत आहे, कारण अदानी यांच्याकडे मोदी यांची दौलत आहे. पण महाराष्ट्र म्हणजे मोदी-शहांची दौलत नाही. अदानी यांचे उद्योग बांगलादेश, पाकिस्तानसह अनेक इस्लामी राष्ट्रांत पसरले व त्यामुळे या लोकांचे 'हिंदुत्व' धोक्यात आले नाही,'' असा टोला राऊत यांनी लगावला आहे ''पंतप्रधान मोदी व गृहमंत्री शहा हे सध्या महाराष्ट्रातच तळ ठोकून आहेत. महाराष्ट्रातला प्रचार संपताच म ोदी हे ब्राझीलला रवाना होतील. ब्राझीलमध्ये त्यांच्यासोबत गौतम अदानी असतील काय? कारण मोदी परदेशात जेथे जातात तेथे अदानी पोहोचतात व त्यानंतर अदानी यांच्या कंपनीला त्या त्या देशात मोठे कंत्राट मिळते. महाराष्ट्रातील निवडणुकीत भाजप-शिंदे-अजित पवार हे पैशांचा पाऊस पाडत आहेत. हा सर्व पैसा कोठून येतो? ते रहस्य आता राहिलेले नाही. म हाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार पाडण्याच्या बैठका गौतम अदानी यांच्याच घरी झाल्या व स्वत: अदानी त्या बैठकांत हजर असायचे, असा स्फोट आता अजित पवार यांनीच केला. नंतर त्यांनी घूमजाव केले असले तरी त्यामुळे महाराष्ट्रातील सध्याचे सरकार कोण चालवत आहे व ठाकरे त्यांना का नको होते? ते उघड झाले,'' असं राऊत 'साम ना'मधील 'रोखठोक' या विशेष सदरात म्हणाले आहेत.

''महाराष्ट्राची लढाई ही आता सरळ सरळ गौतम अदानी व त्यांच्या पैशांच्या साम ाज्याविरुद्ध आहे.

विदर्भातील सर्व सभा तडकाफडकी रद्द करून अमित शहा दिल्लीला

नागपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या रविवारी नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेरसह विदर्भात गडचिरोली व वर्धा या ठिकाणी जाहीर सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. मात्र चारही सभा रद्द करुन अमित शहा तातडीने रविवारी सकाळी दिल्ली रवाना झाले. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शहा यांचा दौरा रद्द होण्याचे कारण समजू शकले नाही



विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने अमित शहा यांचा १५ व १७ नोव्हेंबरला विदर्भ दौरा आयोजित करण्यात आला होता. १५ नोव्हेंबरला विदर्भात त्यांची यवतमाळ मातदार संघात उमरेखड येथे व चंद्रपूर जाहीर सभा होती . ती झाल्यानंतर रविवारी १७ नोव्हेंबरला त्यांची गडचिरोलीसह वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात काटोल व सावनेर येथे त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. अमित शहा यांचे शनिवारी रात्री नागपुरात आगमन झाले.त्यांचा खाजगी हॉटेलमध्ये मुक्काम होता. त्या ठिकाणी रात्री त्यांनी विदर्भातील काही भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. रविवारी सकाळी काटोल मतदार संघात चरणसिंह ठाकूर यांच्या प्रचारासाठी व त्यानंतर सावनेर मतदार संघात आशिष देशमुख यांच्या प्रचारासाठी सभा घेणार होते. त्यासाठी सकाळी १०.३० वाजता निघणार होते. त्यानंतर ग़डचिरोली आणि वर्धा येथे जाहीर सभा घेणार होते मात्र रविवारी सकाळी शहा यांच्या विदर्भातील चारही सभा झाल्याचे भाजपकडून सांगण्यात आले. अमित शहा दिल्लीला रवाना झाल्यानुळे दिल्लीत काय घडले आहे याबाबत काहीच माहिती मिळाली नाही मात्र सकाळी १०च्या सुमारास हॉटेलमधून बाहेर पडले आणि विमानतळाकडे रवाना झाले. जिल्ह्यात बड्या नेत्यांचा प्रचाराचा धुराळा असताना अमित शहा मात्र अचानक दिल्लीका निघाले याबाबत राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा सुरू आहे.

सावनेर व काटोलमध्ये त्शहा याच्या सभेसाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. नागपूर जिल्ह्यातील दोन्ही सभा घेऊन ते ग़डचिरोलीला रवाना होणार होते. मात्र तेथील सभा रद्द झाल्याने आता त्या ठिकाणी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहाण आणि भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या व माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी सभा घेणार आहे. काटोल व सवनेरमध्ये शिवराज सिंग चव्हाण आणि गडचिरोली व वर्धा येथे स्मृती इराणी सभा घेणार असल्याची माहिती भाजपने दिली. अमित शहा याचा दौरा रद्द झाल्याने ग्रामीण भागातील कार्यकर्त्यामध्ये निराशा पसरली. काटोलमध्ये सकाळी ११ वाजता सभा होती.कार्यकार्यकर्ते गर्दी जमवू लागले होते. मात्र त्याचवेळी दौरा रद्द झाल्याचा निरोप आला.भाजप नेत्यांची अ.डचण झाली आहे.

भाजपने ऐतिहासिक बेरोजगारी निर्माण केली आहे

राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

पुणे/प्रतिनिधी: लोकसभेत इथली जनता महविकास आघाडीच्या मागे उभा राहिली. त्यामुळे राज्यात भाजपचा आकडा घटला आहे. डबल इंजिन सरकार म्हणत आहे.महाराष्ट्रात बटेंगे तो कटेंगे असे म्हणून जनतेची दिशाभूल केली जात आहे. मात्र, आम्ही पढोगे तो आगे बढोगे, अशी घोषणा देतो आहोत. पाकिस्तान, हिंदुस्थान, मुसलमान, मंदिर, मस्जिद हे मुद्दे समोर आणले जात आहेत. भाजपने देशात ऐतिहासिक बेरोजगारी निर्माण झाली आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यामधील दरी वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेनासा झाला आहे.असा आरोप राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी केला. ते दि.१७ नोव्हेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी सचिन पायलट पुढे म्हणाले की, आम्हाला राज्यात पसंती मिळत आहे. लोकांचा प्रतिसाद मिळत आहे. भाजपाच्या लोकांनी त्यांनी केलेली कामे लोकांसमोर मांडावीत. आज भाजप पूर्णपणे उघड झाली आहे. १४७ खासदारांना निलंबित केले. भाजप फक्त सत्तेसाठी राजकारण करत आहे. एक हे तो सेफ हे. या अशा घोषणांमुळे लोकांच्या मनात भीती निर्माण केली जात आहे. महिलांना मदत, रोजगार, कृषी या विषयावर भाष्य करत नाहीत. ४५० चा गॅस साडे अकराशे रुपयांना झाला आहे. तुमच्या दीड हजार रुपयांत काय होणार आहे? जनता याला बळी पडणार नाही. आम्हाला लोकांचा प्रतिसाद मिळत आहे. अनेक जागेवर भाजपने बंडखोर उभे केले आहेत. राज्यात स्पष्ट बहुमताने आमचे सरकार येईल. लोकशाही, संविधान वाचविण्यासाठी आम्ही लढत आहोत. अयोध्येत भाजप हरली. इलेक्टराल बॉंड गैर असल्याचे सांगितल्यानंतर भाजपने पैसे वापस द्यायला हवे होते. हेलिकॉप्टर चेकिंग करण्यापेक्षा ॲम्ब्युलन्स, पोलिस वाहने तपासा त्याचा वापर सरकार करू शकते. शिंदे आज मुख्यमंत्री आहेत. मग भाजप त्यांना परत मुख्यमंत्री करतील का, असे भाजपने घोषित करावे. अनेकजण इच्छा बाळगून आहेत. मात्र, आमचेच सरकार येईल. लोकशाही, संविधान वाचविण्यासाठी आम्ही लढत आहोत.अशा पोकळ घोषणा भाजप करीत असल्याचा आरोप राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी केला.

आज सिंदखेडराजा मधील मतदान यंत्र सिलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

सिंदखेडराजा : मा. भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १२ नोव्हेंबर आणि १३ नोव्हेंबर २०२४ रोजी ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करण्याचे काम आज संपन्न झाले.

२४ सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने आपल्या सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये एकूण ३४० मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ३४० मतदान यंत्र (उण) सिलिंग करण्यात आले, ३४० मतदान केंद्राकरिता एकूण ६८० बॅलेट युनिट (इण) सिलिंग करण्यात आले तसेच ३४० व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करून सज्ज करण्यात आले.

त्याचप्रमाणे प्रत्यक्ष मतदानादिवशी काही अडचण उद्भवल्यास राखीव मध्ये ६५ मतदान यंत्र (उण), १३० बॅलेट युनिट (इण), ६५ व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करून सज्ज करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे एकूण मतदान यंत्रापैकी २० मतदान यंत्रावर प्रारूप स्वरूपात १००० प्रमाणे मतदान नोंदवून मतदान यंत्र सुस्थितीत असून मतदान प्रक्रियेसाठी सज्ज असल्याची खातरजमा करण्यात आली. सर्वच मतदान यंत्रावरती प्रारूप मतदान घेतल्यानंतर ते सुस्थितीत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतरच मतदान यंत्र सिलिंग करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ साठी सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये एकूण ३४० मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ३० सिलिंग टीम पुढील २ दिवस म्हणजेच १२ नोव्हेंबर आणि १३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण करणार आहेत. प्रत्येक टीम मध्ये एक झोनल अधिकारी, एक सहाय्यक झोनल अधिकारी, एक ग्राम महसूल अधिकारी, एक महसूल सेवक असे एकूण ४ कर्मचारी -अधिकारी काम करत आहेत त्यातील टीम क्रमांक १४ मध्ये झोनल अधिकारी विजय माईनकर , सहायक झोनल अधिकारी श्रीकांत बुलबुले , ग्राम महसूल अधिकारी विष्णू थोरात , आकाश माघाडे महसूल सहायक हे चार अधिकारी कर्मचारी काम करत आहेत.

कालपासून सुरु असलेल्या या ई.व्ही.एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीनचे सिलिंगचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी मा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीम युद्धपातळीवर काम करत आहे आणि ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट सिलिंग ची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मेहनत घेत आहेत . त्यासाठी मा. तहसीलदार सिंदखेडराजा श्री. अजित दिवटे , मा. तहसीलदार देऊळगाव राजा श्रीमती वैशाली डोंगरजाळ, मा. गट विकास अधिकारी सिंदखेड राजा श्री मुकेश माहोर ,मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा श्री प्रशांत व्हटकर, मा. निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री. मनोज सातव,मा.निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा श्री प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ. अस्मा मुजावर ,मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ. प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, मा.प्र. नायब तहसीलदार श्री. नितीन बढे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी श्री. अंकुश म्हस्के, नोडल अधिकारी श्री सचिन पांचाळ संजय सोनुने तसेच सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग यांनी सिलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी खूप मेहनत घेतली .

महाविकास आघाडीला मतदारांचा कौल !

प्रचारात सिद्धार्थ खरात यांनी घेतली आघाडी : मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

मेहकर: मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी, महायुती व वंचित बहुजन आघाडी अशी तिरंगी लढत होत असून मतदारांनी मात्र महाविकास आघाडीचे उमेदवार उच्चविद्याविभूषीत,प्रशासकीय अधिकारी पदावर काम केलेले व सुसंस्कृत व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे सिद्धार्थ खरात यांना आपली पसंती देत असून मतदारांचा कौल हा महाविकास आघाडीला मिळत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

गत एक महिन्यापासून सुरू झालेली विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली असून निवडणूक केवळ दोन दिवसांवर आली आहे. त्यामुळे मतदार संघात प्रचाराची धुरळा सुरू आहे. आपल्याच पक्षाचा उमेदवार निवडून यावा, यासाठी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते पायाला भिंगरी लावल्यागत संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत प्रचार करीत आहेत. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचलो मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. रॅली, जाहीर सभा, कॉर्नर सभा घेत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे राजकीय राजकारण कडाक्याच्या थंडीत तापत आहे, असे असताना मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात मात्र महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आपल्या जिवाचे रान करीत रात्रीचा दिवस करून प्रचार करीत आहेत. मतदार संघातही महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मतदारांकडून कौल देत उस्फूर्त पाठिंबा दिला जात असल्याचे चित्र संपूर्ण मतदारसंघात दिसून येत आहे. मतदार संघातील प्रत्येक गावात महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना पाठिंबा मिळत असून प्रचार काळात महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी मात्र आघाडी घेतली आहे. याच वेळी मतदारसंघातील जनता ही सत्ताधाऱ्यांवर ताशेरे ओढत अनेक समस्यांचा पाढा महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते तथा उमेदवार यांच्यासमोर वाचून मतदार संघातील समस्या मार्गी लावण्यासाठी आमचा मतदाररुपी आशीर्वाद तुमच्यासोबत असल्याची ग्वाही देत आहेत. महाविकास आघाडीचे सरकार हे गोरगरीब, सर्वसामान्य व शेतकऱ्यांचे सरकार आहे. अल्पकालावधीत महाविकास आघाडीच्या सरकारने अनेक विकासाभूमुख निर्णय घेतले आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी करून शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे, त्याचबरोबर शेतमालाला सुद्धा हमीभावापेक्षा दुप्पट किंबहुना त्यापेक्षा जास्त भाव देऊन शेतकऱ्यांच्या घरात खऱ्या अर्थाने समृद्धी आणली होती. मात्र मधल्या अडीच वर्षाच्या काळात हे तळभद्री सरकार आल्याने गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांना जगणे कठीण झाले आहे. शेतमालाला भाव नाही, तर जीवनावश्यक वस्तुंचे दर गगणाला भिडलेले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात महाविकास आघाडीचे सरकार यावे, यासाठी मतदार महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना उत्स्फूर्त व प्रचंड प्रमाणात पाठिंबा देत असल्याचे चित्र मतदार संघात दिसून येत आहे. मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात मतदारांचा कौल हा महाविकास आघाडीकडे असल्याचे दिसून येत आहे.

प्रचारात रंगत; सर्वच स्तरातून पाठिंबा

विधानसभा निवडणुकीसाठी मतदान हे अवघ्या दोन दिवसांवर आले आहे. मतदानाचा कालावधी जसजसा जवळ येत आहे. तसतशी प्रचारात रंगत वाढत आहे. पदाधिकारी कार्यकर्ते प्रचारात जीव ओतून प्रचार करीत विजयासाठी प्रचंड परिश्रम घेत आहेत. तर महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील सर्वच स्तरातून उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. गावोगावी महिला, तरुण, तरुणी, यासह ज्येष्ठ मतदार महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना जाहीर पाठिंबा देत मतदानरुपी आशीर्वाद देत असल्याचे चित्र मतदारसंघात सर्वत्र दिसून येत आहे.

विविध वृत्त...

अमरावतीच्या दर्यापूर मधील खल्लार गावात भाजप नेत्या नवनीत राणा यांच्या सभेत झालेल्या राड्यानंतर आज दर्यापूरात महारॅलीचे आयोजन,रॅलीला प्रचंड प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

अमरावती/प्रतिनिधी: युवा स्वाभिमानचे उमेदवार रमेश बुंदिले यांच्या प्रचारार्थ प्रचार रॅली आणि कालच्या राड्याच्या घटनेचा केला जातोय निषेध.दर्यापूरच्या मलीयेपूर येथून निषेध रॅलीला सुरवात तर गांधी चौकात रात्री होणार निषेध सभा.निषेध रॅलीत भाजप,युवा स्वाभिमान व हिंदुत्ववादी पीपल्स रिपब्लिकन पार्टी मतदारसंघातील भाजप, शिवसेना शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, लहूजी शक्ती सेना, शेतकरी संघटना व राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे महायुतीचे अधिकृत उमेदवारअनेक सामाजिक संघटनांचा सहभाग. नवनीत रांना यांच्या सभेदरम्यान काल झाला होता मोठा राडा..आज निघालेल्या प्रचार व निषेध रॅलीत झळकले नवनीत राणा यांचा हिंदु शेरणी अशा बॅनरचा उल्लेख.काल खल्लार येथे माझ्यावर समाज कंटकांनी हल्ला केला त्याच्या निषेधार्थ आज दर्यापूर येथे गावा गावातून हजारो मातृ शक्ती, पितृ शक्ती, युवक युवती मैदानात

कांद्याची दरवाढ थांबेना, कांदा साठवणूक करणाऱ्यावर मुख्यमंत्र्यांनी दिले कारवाईचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी : कांदा दरवाढीने राज्यासह देशातील जनता हैराण झाली आहे. राज्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे बाजारभावामध्ये प्रचंड वाढ झाली असून त्याचा फटका ग्राहकांना बसला आहे. याच पार्श्वभूमीवर मर्यादेपेक्षा जास्त कांदा साठवून ठेवणाऱ्या लोकांवर कडक कारवाई करावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

दरम्यान कांदा दरवाढीचा परिणाम हा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांवर होऊ नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मर्यादेपेक्षा जास्त कांदा साठवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश अन्न पुरवठा तसेच पणन विभागाला दिले आहेत.

शेतकऱ्यांकडील उन्हाळ कांदा संपत आला आहे. तर लाल कांदा हळू हळू बाजारात येत आहे. डिसेंबरच्या शेवटपर्यंत कांद्याच्या आवकेमध्ये वाढ होईल अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्याच्या बाजारभावानुसार लाल कांद्याला प्रति क्विंटल ३५०० ते ४००० रुपये असा भाव आहे. तर उन्हाळ कांद्याला ५२०० ते ५५०० पर्यंत दर मिळत आहे.

मेहकर येथे सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली व जाहीर सभेचे आयोजन

मतदारांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहण्याचे महाविकास आघाडीचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

मेहकर/प्रतिनिधी : महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ दि.१८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता मेहकर येथील शिवसेना कार्यालयापासून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. तसेच मेहकर येथील स्वतंत्र मैदान येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या रॅलीला व सभेला मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील महाविकास

आघाडीच्या पदाधिकार्यांसह मतदारांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते तथा उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या प्रचारार्थ सोमवार दि.१८ नोव्हेंबर २०२४ मेहकर येथे भव्य रॅली व जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दि.१८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता शिवसेना कार्यालय, जानेफळ रोड मेहकर येथून भव्य प्रचार रॅलीला प्रारंभ करण्यात येणार असून मेहकर येथील स्वतंत्र मैदान येथे जाहीर सभा होणार आहे. तरी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी पदाधिकारी कार्यकर्ते तथा शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्यावतीने करण्यात आले आहे.

निवडणुक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य टीमचे प्रशिक्षण संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

सिंदखेडराजा : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निवडणूक कार्यक्रम अंतिम टप्प्यात आला आहे, त्याअनुषंगाने आज दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी
मा. निवडणुक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे साहेबांच्या अध्यक्षतेखाली साहित्य वाटप टीमचे प्रशिक्षण आज दुपारी १ वाजता, मतमोजणी कक्ष,वखार महामंडळ, कृषी उत्पन्न बाजार समिती, असोला रोड, सिंदखेडराजा येथे पार पडले.

साहित्य वाटप करताना एकूण ३४ टेबलं वरून साहित्य वाटप करण्यात येणार आहे. प्रत्येक टेबलं वरून १० मतदान केंद्राला साहित्य वाटप केले जाईल, सिंदखेडराजा मतदारसंघात एकूण ३४० मतदान केंद्र आहेत.प्रत्येक टेबलं वर ३ कर्मचारी आणि प्रत्येक २ टेबलं मागे एक क्षेत्रीय अधिकारी यांचे सहायक असतील. दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी सर्व मतदान साहित्य एतच् सुरक्षा कक्ष, वखार महामंडळ, असोला रोड सिंदखेड राजा येथून वाटप होणार आहे.

आजच्या साहित्य वाटपाच्या एक दिवसीय प्रशिक्षणाला मा. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित दिवटे,मा. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली डोंगरजाळ, मा. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश माहोर, मा.नायब तहसीलदार मनोज सातव,मा. नायब तहसीलदार प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार संतोष मुंढे, मा. नायब तहसीलदार डॉ प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार प्रांजल पवार, मा. नायब तहसीलदार सायली जाधव, मा. प्र. नायब तहसीलदार नितीन बढे,प्रसारमाध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, प्रकाश शिंदे संजय सोनुने महसुल सहाय्यक उपस्थित होते.

मोठा घातपात टळला! शस्त्रसाठ्यासह ९ काश्मिरी तरुणांना अटक

अहिल्यानगर/प्रतिनिधी : अहिल्यानगरमधून काश्मीरमधील ९ तरूणांना अटक करण्यात आल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे या तरूणांकडून ९ रायफली आणि ५८ काडतूसे असा मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई लष्कराचा गुप्तचर विभाग आणि तोफखाना पोलिसांनी एकत्रितपणे केली आहे.या कारवाईनंतर पोलिसांनी आणखी शस्त्रसाठा आणि तरूण सापडण्याची शक्यता आहे.त्यामुळे पोलिसांनी शोधमोहिम सूरू केली आहे.या घटनेनंतर शहरात एकच खळबळ माजली आहे. या टोळीचा मुख्य सुत्रधार शब्बीर मोहम्मद गुज्जर याने शहरातील तारकपूर भागात मूळच्या राजौरीचा असलेल्या शेरखान यांच्याकडून २०१५ मध्ये बनावट शस्त्र परवाना व १२ बोअरवेलची रायफल खरेदी केली होती. त्यानंतर त्याने राजौरी येथील काही तरूणांना बोलावून घेतले होते. याबाबची माहिती लष्कराच्या गुप्तचर विभागाला होती.त्यानुसार गुप्तचर विभागाने तोफखाना पोलिसांसोबत तपास करायला सुरूवात केली होती.

या तपासादरम्यान जम्मू आणि काश्मिर राज्यातील काही व्यक्ती बनावट कागदपत्रांच्या आधारे अहिल्यानगर शहर, आजूबाजूच्या शहरात सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करीत असल्याची माहिती तोफखाना पोलिस आणि लष्कर गुप्तचर विभागाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारावर पथकाने छापा टाकून अहिल्यानगर, श्रीगोंदा, सोनई, पुणे अशा विविध ठिकाणाहून नऊ आरोपींना ताब्यात घेतले. हे सर्व आरोपी जम्मू-काश्मिरच्या राजौरी जिल्ह्यातील आहेत. या आरोपीकडून १२ बोअरच्या नऊ रायफली, बनावट शस्त्र परवाने आणि ५८ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

हमारी बहीण किसान की वाघीण हैं

आ. बच्चू कडू यांचा आ. नवनीत राणा यांना इशारा

दैनिक आपला विदर्भ

अमरावती/प्रतिनिधी : रवी राणा यांचे संविधानासोबत काय नाते आहे? लोकसभेच्या निवडणुकीत आम्हाला मैदान मिळाले होते मात्र, तेव्हा सगळे सविधान पायदळी तुडवले. आता ही लढाई श्रीमंत विरुद्ध गरीब अशी आहे. नवनीत राणा आप अगर शेरणी है तो हमारी बहन भी वाघीण आहे. असा इशारा आ. बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांना दिला. यावेळी आ. बच्चू कडू म्हणाले की, आमची जित पक्की आहे, २० रुपयांची साडी अन् २ कोटी ची गाडी असा टाहो आमच्या जवळ नाही, आम्हाला रवी राणा सांगते खोके घेतले, पण तू किती ओके आहे, अशी टीका बच्चू कडू यांनी केली. अनेक भागात राणा यांच्या बॅनरवर भाजपाच्या नेत्यांचे फोटो नाहीत. हिंदू शेरणी बडनेरा मतदारसंघातुन गायब आहे. प्रीती बंड नसत्या तर ही लढाई वेगळ्या बाजुने दिली असती.वरचे लोक चोरटे निघाले, काल जे खल्लार ला झाल खुर्चा फेकल्या त्याला आम्ही समर्थन देत नाही. पण ते खरे आहे का खोटे ते तपासले पाहिजे, बच्चू कडूंना जर धमक्या द्याल तर पोलिसांनी लक्षात ठेवा आम्हीपण दादा आहो. बच्चू कडू यांनी ११५ वेळा मतदान केले,आम्ही कोणाच्या पाठिंबावर निवडून आलो नाही, लोक कधी जय श्रीराम तर कधी अल्लाह अकबर म्हणतात. तर कधी जयभीम म्हणतात. राजकारणासाठी देवाला वापरतात अशी टीका रवी राणा यांच्यावर केली. प्रीती बंड आता कोणत्या पक्षाची नाही की तुमच्या जनतेच्या पक्षाची झाली आहे. उद्यापासून दोनच दिवस राहिले आहे. आता जर हार झाली तर मग खैर नाही,आजची गर्दी पाहून राना तिसऱ्या नंबर वर गेला असं मला वाटते, ७० हजाराच्या विटा खाऊन फ्रॉम हाऊस बांधले, एवढा करणाकटा अख्ख्या हिंदुस्थानात नाही,अशी

टीका रवी राणा यांच्यावर बच्चू कडू यांनी केली. भाजपचे तुषार भारतीय व अपक्ष उमेदवार प्रीती बंड यांच्यात लढत होईल.रवी राणा तिसरा नंबर वर जाईल, प्रति बंड निवडून आल्यावर आटोतून विधानसभेत जाईल. हे सरकार काँग्रेसच असो की भाजपचे तुम्हाला लाज वाटली पाहिजे शाळा सुद्धा तुम्ही चांगले करू शकले नाही, भाजप आणि काँग्रेस तुमच्या डोक्यात जातीचा भूत टाकण्याचं काम करत आहे. अब्दुल कलाम जेव्हा राष्ट्रपती होते तेव्हा हिंदू खत्र्यात नव्हते, नेते तुम्हाला भडकविण्याचे काम करत आहे. ७५ वर्षात काँग्रेस आणि भाजपने शाळा चांगल्या केल्या नाही. घरकुल शहरातल्या लोकांना सव्वा लाखाच आणि गावातल्या लोकांना ७५ हजाराच ही व्यवस्था बदलवणे गरजेचे आहे.प्रीती बंड यांना पाठिंबा दिला म्हणजे त्यांनी प्रहारमध्ये यावे असे नाही,त्यांना स्वातंत्र्य आहे. राज्यात ना आघाडीचे सरकार येईल ना युती च सरकार येईल,गेम तर आमचाच लागणार आहे, आमच्या शिवाय सरकार बनणार नाही, असा विश्र्वासही यावेळी कडू यांनी व्यक्त केला.